जागतिक बँक अर्थसहाय्यित नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प व्यवस्थापन कक्षातील बँक खात्यातील व्यवहार संयुक्त स्वाक्षरीने करण्यास मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांक : नादेकृ - ४६१९/प्र.क्र.२/८-अे,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०७ ऑगस्ट, २०१९

संदर्भ :

१. कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र.हअप्र०७१६/प्र.क्र.८२/राकृवियो कक्ष, दि.१७.०१.२०१८
२. कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र.हअप्र०७१६/प्र.क्र.८२/राकृवियो कक्ष, दि.१६.०९.२०१६
३. प्रकल्प संचालक, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, मुंबई यांचे पत्र क्रमांक नादेकृसंप/०५१८/ प्र.क्र. ५०/ लेखा शाखा, दिनांक १९.०६.२०१९

प्रस्तावना:-

विदर्भ व मराठवाडयातील १४ जिल्हे व जळगाव अशा एकूण १५ जिल्ह्यातील निवडक ५१४२ गावांमध्ये सन २०१८-१९ पासून पुढील ६ वर्षांच्या कालावधीत जागतिक बँक अर्थसहाय्यीत नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प राबविण्यास संदर्भ क्र. १ येथील दिनांक १७.०१.२०१८ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. तसेच संदर्भ क्रमांक २ येथील दिनांक १६.०९.२०१६ च्या शासन निर्णयान्वये प्रकल्प संचालक, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प यांना प्रकल्पासाठी नियंत्रण अधिकारी व वित्त विशेषज्ञ यांना प्रकल्प व्यवस्थापन कक्षासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. प्रकल्पासाठीच्या वित्तीय व्यवस्थापन पुस्तिकेनुसार जिल्हा स्तरावर जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी हे नियंत्रण अधिकारी व लेखा अधिकारी हे आहरण व संवितरण अधिकारी म्हणून प्रकल्पासाठी काम पाहत आहेत. तसेच उप विभाग स्तरावर उप विभागीय कृषि अधिकारी हे नियंत्रण आहरण व संवितरण अधिकारी म्हणून प्रकल्पासाठी काम पाहत आहेत. प्रकल्पातील सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांच्या बँक खात्याचे व्यवहार हे सध्या एकाच स्वाक्षरीने करण्यात येतात.

२. जागतिक बँकेच्या मिशनच्या “Aide Memoire” मधील Annex-५ मध्ये “The Project must ensure that the mode of operation of all bank accounts under the project is Joint Signatary” अशा सूचना दिलेल्या आहेत. जागतिक बँकेच्या मिशनच्या सूचनांच्या अनुषंगाने नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या प्रकल्प व्यवस्थापन कक्षातील **आहरण व संवितरण अधिकारी यांच्या बँक खात्याचे व्यवहार**, ‘वित्त विशेषज्ञ’ व ‘लेखा अधिकारी’ यांच्या संयुक्त स्वाक्षरीने, आणि **डीबीटी बँक खात्याचे व्यवहार** ‘वित्त विशेषज्ञ’ व ‘प्रकल्प उप संचालक’ यांच्या संयुक्त स्वाक्षरीने करण्याबाबत असे प्रकल्प संचालक, नानाजी देशमुख कृषि संजीवनी, मुंबई यांनी संदर्भ क्रमांक ३ च्या पत्रान्वये प्रस्तावित केले होते.

३. संदर्भ क्रमांक २ येथील शासन निर्णयान्वये दिनांक १६.०९.२०१६ च्या शासन निर्णयान्वये प्रकल्प संचालक, प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प यांना प्रकल्पासाठी नियंत्रण अधिकारी व वित्त विशेषज्ञ यांना **राज्य स्तरावर** आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे.

४. जागतिक बँकेच्या उपरोक्त नमूद सूचनांचा विचार करुन नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या प्रकल्प व्यवस्थापन कक्षातील **आहरण व संवितरण अधिकारी यांच्या बँक खात्याचे व्यवहार** 'वित्त विशेषज्ञ' व 'लेखा अधिकारी' यांच्या संयुक्त स्वाक्षरीने, आणि **डीबीटी बँक खात्याचे व्यवहार** 'वित्त विशेषज्ञ' व 'प्रकल्प उप संचालक' यांच्या संयुक्त स्वाक्षरीने करण्यास एक विशेष बाब म्हणून मान्यता देण्याचे शासनाच्या विचाराधीन होते, त्याबाबत शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय:-

१. जागतिक बँकेच्या सूचनेनुसार नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या प्रकल्प व्यवस्थापन कक्षातील **आहरण व संवितरण अधिकारी यांच्या बँक खात्याचे व्यवहार**, 'वित्त विशेषज्ञ' व 'लेखा अधिकारी' यांच्या संयुक्त स्वाक्षरीने, आणि **डीबीटी बँक खात्याचे व्यवहार** 'वित्त विशेषज्ञ' व 'प्रकल्प उप संचालक' यांच्या संयुक्त स्वाक्षरीने करण्यास अनुमती देण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक **अनौक/२०१९/२६८/कोषा प्रशा-५** दिनांक ०९/०७/२०१९ अन्वये प्राप्त मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८०७१६५९४३२२०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Shrikant Chandrakant Andge

Digitally signed by Shrikant Chandrakant Andge
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5d5ab93b4e4f2fcd87e12fe19b8965025d482b1bee0fffaa62085c34db6bfd8c, serialNumber=d8d9626c9e038380cd235c048f20d7ce74cffd3a95f2ac3c192e9c991f358271, cn=Shrikant Chandrakant Andge
Date: 2019.08.07 17:07:34 +05'30'

(श्रीकांत आंडगे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२. अपर मुख्य सचिव (नियोजन), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
३. प्रकल्प संचालक, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प,जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई-०५
४. सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
५. आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, कृषि आयुक्तालय, पुणे
६. सर्व कृषि संचालक, कृषि आयुक्तालय, पुणे
७. सर्व जिल्हाधिकारी
८. सर्व विभागीय कृषी सहसंचालक,
९. सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी
१०. सर्व जिल्हा प्रकल्प संचालक (आत्मा)
११. सर्व उपविभागीय कृषि अधिकारी
१२. संचालक, लेखा व कोषागरे, महाराष्ट्र राज्य
१३. महालेखापाल, महाराष्ट्र १/२(लेखापरिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर,
१४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१५. वित्त विभाग (का. व्यय-१/अर्थसंकल्प-१३), मंत्रालय, मुंबई
१६. निवडनस्ती कार्यासन-८-अे.